Jagdamba Education Society's

Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

## * Central Library *

Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

Please Consider the Environment Before Printing…

Date: 30/07/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

### News Paper Name: आपलं महानगर

**Page No. 04**

आपल्या वाचण्या, आतल्या वाचण्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष

## जागतिक किर्तीचे कार उद्योजक हेन्री फोर्ड



जागतिक किर्तीचे उद्योजक हेन्री फोर्ड यांचा जन्म ३० जुले १८६३ रोजी अमेरिकेतील मिशिगनमध्ये एका छोट्या शहरात झाला. एका शेतकऱ्याच्या घरात जन्माला आलेल्या हेन्रीला ४ भावंडं. घरची परिस्थिती बेताची. शेतातून मिळेल तेवढंच उत्पन्न. शालेय शिक्षणात हेन्रीला जास्त रस नव्हता. १२ वर्षांच्या हेन्रीला त्याच्या वडिलांनी हातात घालायचं घड्याळ भेट दिलं. हेन्रीने ते घड्याळ खोललं आणि परत जोडलं. जगातली पहिली आधुनिक कार तयार करण्याची हीच होती पहिली पायरी, जिथं त्याच्या वयाची मुलं मैदानात खेळ खेळायची तिथं हेन्री आसपासच्या घरातली बिघडलेली घड्याळं दुरुस्त करायचा.

त्या काळात वाहतुकीसाठी घोडागाडीच वापरली जायची. मग ती सामानाची असो किंवा माणसांची. शेतात वडिलांना मदत करत असताना हेन्रीने पहिल्यांदा एक असं मशीन पाहिलं, जे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी चक्क घोड्याशिवाय जात होतं. पाण्याच्या वाफेवर चालणारं, शेतात वापरलं जाणारं हे मशीन म्हणजे हेन्रीसाठी आश्चर्य होतं. समोर दिसणारं हे मशीन म्हणजे हेन्रीचा हेन्री फोर्ड होण्यासाठी एक निमित्त होते. मशीनवर प्रेम कणाऱ्या हेन्रीने तेव्हाच ठरवलं की आपण देखील अशी गाडी बनवायची जी घोड्यांशिवाय चालेल. डेट्रोईटमध्ये गेल्यावर त्याने स्टिम इंजिन बनवणाऱ्या एका कंपनीमध्ये नोकरी स्वीकारली. सर्वसामान्यांना वापरता येणारी गाडी बनवण्याचे त्याचे प्रयत्न चालूच होते. त्या काळच्या चारचाकी गाड्या इतक्या महाग होत्या की श्रीमंतसुद्धा त्या घेताना विचार करत होते. अशा या काळात हेन्री फोर्ड यांनी सर्वसामान्यांना परवडेल अशी चारचाकी गाडी बनवण्याचे प्रयत्न चालू ठेवले. फक्त काळ्या आणि डार्क निळ्या रंगात येणारी गाडी हळूहळू फक्त फोर्ड कार काळ्या रंगात मिळू लागली. या गाड्यांचे स्टिरिंग व्हील डावीकडे होते. गाडी चालवायला सोपी होती. आधुनिक युगातील चारचाकी गाड्यांमध्ये क्रांती करणाऱ्या या अवलियाने ७ एप्रिल १९४७ रोजी आपल्या पत्नीच्या खांद्यावर जीव सोडला.

Nashik Edition

Jul 30, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401